# अस्पृश्यतेसंदर्भात महात्मा फुले यांचे विचार

**डॉ. सरिता नागोराव गाडेगावकर**
श्रीमती इंदिरा गांधी अध्यापक महाविद्यालय वसरणी नांदेड

महात्मा ज्योतिबा फुले 1900 व्या शतकातील थोर विचारवंत आणि तत्त्वज्ञ आहेत. आपल्या मूलगामी विचारांना कृतीची जोड देऊन तत्व आणि व्यवहार यांच्यात सुसंगती त्यांनीच आणली. त्यांच्या बरोबरच्या काळात विचारवंत कमी नव्हते, सामाजिक सुधारणांची प्रामाणिक तळमळ ही त्यांना होती, पण त्यांचा जन्म उच्चवर्णीय जातीत झाला असल्यामुळे त्यांच्या विचाराला वर्ण जातीच्या मर्यादा पडल्या. महात्मा ज्योतिबा फुले हे कनिष्ठ जातीत जन्मल्यामुळे त्यांना तत्कालीन शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर, दलित, स्त्रिया यांच्या समस्या अचूकपणे कळल्या.

मनुष्याला त्यांच्या मनुष्यत्वाचे ज्ञान करून देणे समान हक्क, समान संधी, व समान दर्जा मिळवून देण्यासाठी महात्मा फुले जगले त्यांची जीवनसरणी व जीवनोद्देश मिशन त्यांना निश्चितपणे प्राप्त झाले होते. ध्येयवादी, करारी व ठाम असलेले हे एक द्रष्टे व्यक्तिमत्त्व झाले. अव्वल इंग्रजी हा त्यांचा काळ होता सण 1848 साली त्यांच्या सार्वजनिक आयुष्याला सुरुवात झाली. पुढे एकूण चाळीस वर्ष त्यांनी समाजाची सेवा केली.

**अस्पृश्यता आणि महात्मा फुले**

सामाजिक समतेच्या चळवळीचे फुले आद्य प्रवर्तक मानले जाता. गुलामगिरी, ब्राह्मणांचे कसब, या पुस्तकातून अस्पृश्यते बाबत लिखाण केले. अस्पृश्यांना समाजात सर्वात अधिक जाच होतो, त्यांचा अत्याधिक छळ होतो. अस्पृश्यता ही आपल्या सामाजिक जीवनातील लाजिरवाणी बाब आहे. कारण अस्पृश्यतेचे मुळे माणसाला माणसा सारख्या जगण्यापासून वंचित केले जाते. त्याच्या सावलीचा सुद्धा विटाळ होतो, त्याच्या चालल्याने रस्त्याला विटाळ होतो. त्यामुळे सामाजिक जीवनातील त्याचे अस्तित्वच संपुष्टात आले होते. अन्न, वस्त्र आणि पाणी इत्यादी दैनंदिन अत्यावश्यक गरजांसाठी त्यांना इतरांवर अवलंबून राहावे लागे. महार मांग समाजातील जगत असणारे प्राण्यांपेक्षाही वाईट असे जीवन जगत होते. गाईंचे मूत्र पवित्र मग अस्पृश्य माणसाचा स्पर्श अपवित्र कशा? हा प्रश्न त्यांना नेहमी सतावत असे. जातिव्यवस्थे पेक्षाही अस्पृश्यता अधिक भयानक स्वरूपात अस्तित्वात होती. महार, मांग, चांभार हे अस्पृश्य लोक होते.

या अस्पृश्य जातीत महार प्रमुख होती त्यानंतर मांग यांचा क्रमांक लागतो. पुरुषांना अस्पृश्यतेच्या नावाखाली कुत्र्या मांजरा प्रमाणे वागणूक दिली जात असे. अस्पृश्याच्या सावलीचा ही काही विटाळ भट ब्राह्मणांना होत असे.

त्यामुळे अस्पृश्यांना सकाळी नऊ वाजेपर्यंत व सायंकाळी तीन वाजेनंतर शहरात फिरण्यास बंदी होती. शहरात फिरताना त्यांना थुंकण्यासाठी गळ्यात मडके बांधावे लागे, सार्वजनिक शाळा, पाणवठे व मंदिरात त्यांना प्रवेश करण्यास मनाई होती. त्यांची वसाहत गावकुसाबाहेर ठेवली जाई. उच्चवर्णीयांची वेठ बीगार वाहून व त्याची सेवाचाकरी करूनच त्यांना उदरनिर्वाह करावा लागत असे. गावची सर्व हलकी व गलिच्छ स्वरूपाची कामे त्यांना करावी लागत. अज्ञान, उपासमारी व मागासलेपणा हे त्यांच्या पाचवीलाच पुजलेले होते. त्यांच्या पावलावर पाऊल पण पडल्यावर विटाळ होतो अशी समजूत होती त्यामुळे आपल्या पावलाचे ठसे मोडून टाकण्यासाठी पुरुषांना कमरेला वृक्षाची फांदी बांधून शहरात फिरावे लागत असे. महार, मांगांना शिक्षणाची बंदी होती कोणास वाचता आले व ते बाजीरावास कळाले तर तो त्यांना कठोर शिक्षा करी. महार, मांगांना बारीक पांघरून घेण्याची बंदी होती कारण हे पांघरून ब्राह्मणांनीच करावे अशी चाल होती याचे उल्लंघन करणाऱ्यास बांधून मारीत. पुरुषांवर होणारा अन्याय व जुलूम पाहून महात्मा फुले हवालदील झाले. महार, मांगावर अस्पृश्यतेच्या नावाखाली होणारा जुलूम कमी करण्यासाठी फुले यांनी अस्पृश्यांचा उद्धार करण्याचे कार्य हाती घेतले.

**अस्पृश्यता निवारणाचे कार्य :** शिक्षणाशिवाय अस्पृश्यांच्या जीवनात परिवर्तन होणार नाही, म्हणून महात्मा फुले यांनी इसवी सन 1851 मध्ये पुणे शहरात नाना पेठ येथे अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढली. त्यामुळे प्रथमच अस्पृश्यांना शिक्षणाची दारे खुली झाली. अस्पृश्य स्त्रियांनाही शिक्षण देण्यात येऊ लागले.

महात्मा फुले यांनी इसवीसन 1868 मध्ये आपल्या वाड्यातील विहीर व पाण्याचा हौद पाणी भरण्यासाठी अस्पृश्यांना खुला केला. त्यांचे हे कार्य क्रांतिकारी होते. महात्मा फुले महार व मांगवाड्यात फिरून त्यांना आपली मुले शाळेत पाठविण्यात बद्दल व स्वच्छ राहण्याबद्दल नेहमी उपदेश करीत. तसेच ते वरिष्ठ लोकांनी अस्पृश्यांचा विटाळ पाळू नये या विषयावर नेहमी लोकांबरोबर वाद-विवाद करीत. अस्पृश्यांना शिवून घ्या, महाराज, मांग यांच्या बरोबर सर्रास रोटी व्यवहार करा. असे फुले यांचे म्हणणे होते. हे काम करणे म्हणजे धर्मबाह्य काम समजले जात होते. त्यामुळे फुले यांच्या समाजाने त्यांना त्यांच्या या कार्याबद्दल बहिष्कार घालण्याची धमकी दिली. परंतु फुले यांनी अस्पृश्यता निवारणाचे काम सोडले नाही.

अनेक समाजसुधारकांनी उच्चवर्णीय लोकांकडून अस्पृश्यतेच्या नावाखाली अस्पृश्यांवर होणार्या अन्यायावर व त्यांना दिल्या जाणाऱ्या वागणुकीवर टीकेचे प्रहार केले. परंतु यापेक्षा त्यांना वेगळे काही करता आले नाही. अनेक

संतांनाही यासंदर्भात भरीव स्वरूपाचे कार्य करता आले नाही. अस्पृश्यता निवारणा बद्दल गाजलेले संत एकनाथ महाराज सुद्धा यासाठी भरीव कार्य करू शकले नाहीत. ते म्हणतात

**अंत्यजाचा विटाळ ज्यासी | गंगास्नाने शुध्दत्व त्यासी ||**
**ते गंगास्नान अंत्यजासी | शुध्दत्वासी अनुपयोगी ||**

म्हणजे अस्पृश्यांच्या स्पर्शाने विटाळ झाल्यास ज्याने पवित्रते साठी गंगा नदीत स्नान करावे. परंतु जन्माने अस्पृश्य असलेल्या व्यक्तींनी कितीही गंगास्नान केले तरी ते उपयोगी नाही.

महात्मा फुले असे बोलके सुधारक नव्हते. ते आपले कार्य कृतीमध्ये आणत असत. त्यांनी इसवीसन 1873 मध्ये अस्पृश्यता निवारण्याचा जाहीरनामा काढला त्यामुळे भारत सरकारला पुढे अस्पृश्यता नष्ट करण्याचा कायदा करता आला. ब्रिटिश सरकारने अस्पृश्यांना त्यांच्या लष्करात प्रवेश देऊन अस्पृश्यता घालविण्याचे प्रयत्न केले.

**सारांश**

अस्पृश्यते मुळे समाजातील फार मोठा घटक समाजातून वेगळा पडला आहे. त्याला सामावून घेतले जावे. आपल्या लिखाणातून फुले म्हणतात स्पृश्य-अस्पृश्य एक अन्न खातात. दोघांचा आत्मा एकच आहे, अशावेळी त्यांच्यात भेदभाव करणे, नैसर्गिक आहे, अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार यासाठी त्यांनी ब्राह्मणांना जबाबदार धरले आहे. ब्राह्मणापासून अस्पृश्य पर्यंत सर्वांच्या मदतीने समानतेच्या तत्त्वावर आधारित समाज निर्माण करून त्यांच्या साह्याने देशोन्नती व ऐक्य निर्माण करण्याचे फुलांचे स्वप्न होते. निसर्गाने महार मांग आणि आर्य ब्राह्मण यात भेदभाव केले नाही ते सर्व सारखेच असतात महार मांगांना बंद मुक्त करून त्यांच्या सर्वांगीण प्रगतीचा मार्ग खुला केला तर देशाच्या ज्ञान भंडारात संपत्तीत आणि लोकी का भर घालतील म्हणून जातीजातीतील श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव नष्ट करून देशात बळकटी आणावी असे महात्मा फुलेंची यांचे मत होते.

**संदर्भ**

१. कुंभार प्रा. नागोराव (संपादक) समाज सुधारक महात्मा फुले, प्रबोधन प्रकाशन, लातूर. 1990
२. चव्हाण रा. ना. 2003 महात्मा फुले यांचा शोध व बोध, अक्षर श्रद्धांजली, कोथरूड पुणे.
३. चोपडे किसन, भारतीय विचारवंत, गोमटेश प्रकाशन, परभणी.
४. जोशी ना. वी. 1971, पुणे शहराचे वर्णन, मुंबई साहित्य संग्रह द्वितीय आवृत्ती.
५. महात्मा फुले, गुलामगिरी, सुधीर प्रकाशन, वर्धा.
६. फडके य. दी., महात्मा फुले समग्र वांग्डमय, मुंबई.